सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता वनीकरणाद्वारे सागरी किनारपट्टीचे संरक्षण (२४०६ ८६०४) लेखाशीर्षांतर्गत अनुदान वितरण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः साववि-२०१८/प्र.क्र.७६/फ-११

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : १४.०३.२०१९

वाचा :-

१) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. ०२.०४.२०१८

२) प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे क्रमांक कक्ष -१/ पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.३७/२४२/२०१८-१९, दि. १५.०५.२०१८

३) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक **साववि-२०१८/प्र.क्र.७६/फ-११** दि. २१.०५.२०१८

४) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २५.०१.२०१९

५) महसूल व वन विभाग शासन ज्ञापन क्रमांक बीयुडी-२०१९/२४०६/प्र.क.१९/ब-१, दि. ११.०३.२०१९

६) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र. ४२/अर्थ-३, दि. ८ मार्च, २०१९.

प्रस्तावना :-

सामाजिक वनीकरणाचे महत्व लक्षात घेऊन वृक्ष लागवड व संवर्धन करण्याकरीता सामाजिक वनीकरणांतर्गत **"वनीकरणाद्वारे सागरी किनारपट्टीचे संरक्षण (२४०६ ८६०४)-३३- अर्थसहाय्य"** या योजनेंतर्गत सन २०१८-१९ करिता रु.३३.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

वित्त विभागाच्या संदर्भिय दि. ०२.०४.२०१८ च्या परिपत्रकानुसार **वनीकरणाद्वारे सागरी किनारपट्टीचे संरक्षण (२४०६ ८६०४)**-या योजनेसाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात एप्रिल २०१८ ते डिसेंबर २०१८ या ९ महिन्यांच्या कालावधीकरिता अर्थसंकल्पित रकमेच्या ७०% मर्यादेत म्हणजेच रु. २३.१० लक्ष इतका निधी संदर्भीय शासन निर्णय दि. २१.०५.२०१८ अन्वये वितरीत करण्यात आला आहे. आता वित्त विभागाच्या संदर्भ क्र.२ येथील दि. २५.०१.२०१९ च्या शासनपरिपत्रकानुसार महसूली लेख्यातील कार्यक्रम खर्चासाठी ८०% निधी वितरणास मान्यता आहे. तसेच संदर्भ क्र. ५ अन्वये प्राप्त मंजूर सुधारित अंदाजाच्या मर्यादेत (०१) (०३) वनीकरणाद्वारे सागरी किनारपट्टीचे संरक्षण- (२४०६ ८६०४) ३३-अर्थसहाय्य"या लेखाशिर्षातर्गत उर्वरित १० % निधी रु. ३.३० लक्ष वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात सामाजिक वनीकरण विभागांमार्फत राबविण्यात येणा-या **"वनीकरणाद्वारे सागरी किनारपट्टीचे संरक्षण (२४०६ ८६०४)"** या योजनेकरिता रु.३.३० लक्ष इतका निधी वितरित करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखड्याप्रमाणे, विहित कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता

घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

३. सदर निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका यामध्ये उल्लेख केलेल्या तरतुदींनुसार व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

४. जिल्हानिहाय वितरीत तरतुदीची माहिती व राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाची/झालेल्या खर्चाचा तपशील शासनास दरमहा विहित प्रपत्रात सादर करण्यात यावा. तसेच योजनेचे संनियंत्रण प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्यामार्फत व्हावे.

५. सदर योजने अंतर्गत होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ च्या मंजूर अर्थसंकल्पीत निधीतून वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२.०४.२०१८ सोबतच्या परिशिष्टातील अ.क्र.८ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या पूर्ततेच्या अधिन राहून खर्ची टाकण्यात यावा.

"मागणी क्र.सी-७,
२४०६ वनीकरण व वन्यजीवन, (योजनांतर्गत),
(०१) वनीकरण,
१०२, सामाजिक क्षेत्रीय वनीकरण
(०१)(०३) वनीकरणाद्वारे सागरी किनारपट्टीचे संरक्षण- (२४०६ ८६०४),३३-अर्थसहाय्य"

६. वितरित करुन घेतलेला निधी मंडळे/ महामंडळ यांच्या वा इतर बँक खात्यात, स्वयंप्रपची लेख्यामध्ये अथवा सार्वजनिक बांधकाम विभगाकडील ठेव अंशदान निधीमध्ये काढून ठेवता येणार नाही.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१८/प्र.क.६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ व दि. २५.१.२०१९ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३१४१७०५५७७८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DAMODHAR SITARAM DALVI

Digitally signed by DAMODHAR SITARAM DALVI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=ef72079fa46879c38e604681191069c57000e73e78700748258ef7a9095f84d9, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=f62a7252ed770981b2324209adc4d21c5f260d6817740e3a114e91e153b61422, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=DAMODHAR SITARAM DALVI
Date: 2019.03.14 17:09:13 +05'30'

(दामोधर दळवी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण , महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) (११ वृत्त)
५. वनसरंक्षक , सामाजिक वनीकरण (६ वृत्त)

६. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण (सर्व जिल्हे)
७. महालेखापाल, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ४०० ०३२.
१०. निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई
११. वित्त विभाग, व्यय-१०, अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२
१२. कार्यासन अधिकारी, फ-२,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५. निवडनस्ती/फ-११.